# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/02/2023 (शनिवार) सकाळ

## घरफोडी

**१) पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत २० कि. मी. अंतरावरील बेसुर ता. उमरेड येथे दिनांक २४/०२/२०२३ चे ०१.३० वा. ते ०२.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– किशोर गंगाधर भुडे, वय ४२ वर्ष, रा. बेसुर ता. भिवापुर जि. नागपूर हे आपल्या मुलाबाळांना भेटण्याकरीता बाहेरगावी गेले असता व घरी परत आले तेव्हा त्यांच्या घराचा समोरील दरवाज्याला लावलेला ताला तुटला दिसला म्हणुन फिर्यादीने आतमध्ये जावुन पाहिले असता आत मध्ये घराचे समोरील दरवाजाला लावलेला ताला सुध्दा तुटलेला दिसला पुन्हा आत मध्ये जावुन पाहिले असता भिंतीमध्ये असलेल्या लाकडी आलमारीचा कोंडा स्क्रुसहीत बाहेर निघालेला दिसला व त्यात ठेवलेले सर्व सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले प्लॉस्टीकचा डब्यामध्ये ज्यात आई–वडीलांचे हातचे असलेले दागिने ज्यामध्ये जुनी सोन्याची पोत ०३ तोळे किंमती अंदाजे ६०,०००/– रूपये, बांगडया ०४ तोळे किंमती अंदाजे ८०,०००/– रूपये, गोप सोन्याचा ०१ तोळा किंमती अंदाजे २०,०००/– रूपये असा एकुण आठ तोळे जुने सोने किंमती अंदाजे १,६०,०००/– रूपये व नगदी ६०,०००/– रूपये असा एकुण २,२०,०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पांडे पोस्टे उमरेड मो. नं. ९४२२११८९९६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. वेलतूर** :– अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा गोठनगाव पुर्नवसन येथे दिनांक २४/०२/२०२३ चे १३.३० वा. ते १६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. बेबी सुरेश देव्हारे, वय ३५ वर्ष रा. गोठनगाव पुर्नवसन ही आपल्या घराला कुलुप लावुन पोळया बनविण्याकरीता गेली असता अंदाजे ०४ वाजताचे दरम्यान फिर्यादीचा मुलगा नामे– सुमित हा शाळेतून घरी आला व सांगण्याकरीता आला की आपले घराचे कुलूप तुटलेले आहे. तेव्हा फिर्यादीने आत मध्ये जावुन बघितले असता गोदरेज आलमारीचे कपाट उघडे होते. कपडे अस्ताव्यस्त फेकलेले होते व लॉकर तुटलेले दिसत होते. तेव्हा लॉकरमध्ये ठेवलेले ५०० व १०० चा नोटा कींमती अंदाजे ६३००/– रूपये व कंटी मण्याची गळसुळी १० ग्रॅम, नथ ३ ग्रॅम, कानातील टॉप्स ३ ग्रॅम, १ ग्रॅम ताईत, काळी गळसुळी सोन्याचे मनी ३ ग्रॅम असा एकुण २० ग्रॅम जुने सोने कींमती अंदाजे ६३,०००/–रू. असा एकूण ६९,३००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. वेलतूर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. ६३६ मदन आसतकर पोस्टे वेलतूर मो. क्र. ९०११८५१६३६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर